# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक १२/०९/२०२१ (रविवार )


## —: अंमली पदार्थाची तस्करी करणारे तस्कर गजाआड स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही १ करोड १० लाख रुपयाचा गांजा जप्त :—

दिनांक ११/०९/२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपुर ग्रामीण हद्दीत पो.स्टे. बुटीबोरी परीसरात स्थानीक गुन्हे शाखा चे पोलीस अधिकारी व अंमलदार सह पेट्रोलींग करीत असता खास गुप्त बातमीदाराने विश्वसनिय खबर दिली कि, ट्रक क्र. आरजे—२७ जीए—८८०४ या मालवाहु ट्रक मध्ये अंमली पदार्थ गांजा असुन सदर ट्रक आंध्रप्रदेश येथुन निघालेला असुन नागपुर मार्गे जाणार आहे. प्राप्त माहितीची सुचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना देवून गोपनिय माहीतीवर शहानीशा करून कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता पथक पंच, इलेक्ट्रॉनीक वजन काट, स्टाफ, सिल साहित्य व लॅपटॉप प्रिंटरसह हिंगणघाट ते बुटीबोरी मार्गाने पेट्रोलिंग व नाकाबंदी करीता रवाना झाले. नाकाबंदी दरम्यान मुखबिराव्दारे प्राप्त झालेल्या खबरे नुसार ट्रक क्र. आर.जे २७/जीए८८०४ हिंगणघाट कडून बुटीबोरी कडे येतांना दिसून आला. प्राप्त खबरेतील वाहन हेच असल्याबाबत खात्री झाल्याने ट्रक थांबवून ट्रकची पंचासमक्ष झडती घेतली असता ट्रक मध्ये कोको बिन्स (कॉफी बिया) चे ३६५ बॅग चे आत मध्ये (मध्य भागात) ४० चुंगडयांमध्ये अंमली पदार्थ ओलसर वनस्पती गांजा वजन ११०४ किलो एकुण किं. १,१०,४०,०००/— अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आला. ट्रक मध्ये रोहीत लखन जयस्वाल, वय २५ वर्ष, धंदा ट्रक ड्रायव्हर, पत्ता :कठरा, तह. गुन्नुर जिल्हा पना (मध्यप्रदेश), सोनु कवरसिंग चव्हाण, वय ३१ वर्ष, धंदा ट्रक क्लिनर, पत्ता :देवसर, तह. भिवाणी जिल्हा भिवानी (हरीयाणा) हे मिळुन आले. त्यांचेकडे मिळुन आलेल्या गांजा बाबत विचारपुस केली असता सदर गांजा तेलंगाना मध्ये खम्मम या भागातून ट्रक मध्ये भरलेला असून सदर गांजा हा पंजाब येथे देणार होतो असे आरोपीने सांगीतले. आरोपींना रितसर ताब्यात घेवून ११०४ किलो गांजा, टाटा कंपनीचा १२ चाकी ट्रक मॉडल क्र. २५१८ ट्रक क्रमांक आरजे २७/जीए—८८०४ किमत २०,००,०००/—, एक रियलमी कंपनीचा मोबाईल फोन कि. १०,०००/— एकुण १,३०,५०,०००/— चा मुद्येमाल जप्त करुन अरोपी विरुध्द पो.स्टे. बोरी येथे अप ४१० /२०२१ कलम २०,२२,२९ एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. याप्रकारे ट्रन्सपोर्ट कंपनीकडून माल वाहु ट्रक/कंटेनर मध्ये माल वाहतुक करणारे ड्रायव्हर व क्लीनर हे माल लोडींग झाल्यानंतर त्यामध्ये दिलेल्या ठिकाणी आपले ट्रक/कंटेनर थांबवून तेथून अंमली पदार्थ सदर मालाचे आतील भागात लोड करुन आपल्या आर्थीक फायदाया करिता वाहतुक करित असल्याने आढळुन येते. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.स्टे. बुट्टीबोरी करित आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्रावार, सपोनि राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोहवा गजेन्द्र चौधरी, महेश जाधव, नरेंद्र पटले, पोना रामा आडे, सत्यशिल कोठारे, राजेश रेवतकर, आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, पोशि महेश बिसने, अमृत किनगे, रोहन डाखोरे, चालक चासफौ साहेबराव बहाले, चापोकॉ आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)


GROMOR
PURE FISH MEAL


GOODS
CARRIER
All India
जय बाबा की
Permit
NATIONAL
PERMIT
TATA
RJ27GA8804

## —: चोरीचा गुन्हा ०२ तासाचे आत उघड मुद्येमाल व आरोपी ताब्यात स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही :—

दिनांक १०/०९/२१ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे संतोश इद्रासन यादव वय ३८ रा कॉलनि क्वाटर नं. ५२७ कामठी खदान यांनी रिपोर्ट नोंदविली की, वेकोली चे बंद वर्कशॉप स्टोर चे खिडकि चे रॉड तोडुन आत प्रवेश करून स्टोर मध्ये ठेवलेले २५ नग लोखंडी प्रति नग किमती १२०० रू प्रमाणे असा एकुण किं.३०००० रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चारून नेला आहे. अश्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप क्रमांक 337/2021 कलम 461,380 भादवि अन्वये नोंद होताच पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा यांनी सदर गुन्हयाचे समांतर तपास करण्याचे आदेशान्वये समांतर तपास स्था.गु.शाखा चे पथकाकडून सुरु करण्यांत आले असता गुप्त बातमीदार कडून मिळालेल्या माहिती वरुन १) राधे बंडु मेश्राम वय २२ वर्ष रा. कन्हान, २) सुभम नेमचंद राऊत वय २० वर्ष रा. कन्हान, ३) अजय शिवपुजन गौतम वय २९ वर्ष रा. कन्हान, याना ताब्यात घेवून साखेळ चौकशी केली असता त्यांनी चोरी करुन नमुद मुद्येमाल सोनु साहेत शाहु वय २९ रा. कळमना बस्ती, यांना विक्री केल्याचे कबुल केले. चोरी गेलेला सपुंर्ण मुद्येमाल व चोरी केलेल्या मालाची वाहतुक करण्यात आलेल्या वाहन महिन्द्र अल्फा प्लस एम. एच.३१ एफआर ०२३६ व आरोपीस ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीस्तव पो.स्टे. कन्हान चे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, पोना शैलेष यादव, सत्यशिल कोठारे, पोनि विरेन्द्र नरड, प्रणय बनाफर चालक चासफौ साहेबराव बहाले यांनी पार पाडली.
(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)


0236





## —: प्राण घातक हल्ला करणारा आरोपी अजागाड स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा ची कार्यवाही :—

दिनांक ०९/०९/२०२१ रोजी पो.स्टे. कुही चे हद्दी तील उटी शिवारात अज्ञात ईसमानी श्री. दिपांतर बृजोन मंडल वय ३० वर्ष रा. दिनकर नगर, अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया यास अज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने डोक्याच्या मागच्या बाजुस व चेहऱ्यावर मारून जिवानिशी ठार करण्याच्या उद्देशाने गंभिर जखमी केले होते. सदर बाबत पो.स्टे. कुही येथे अप क्रमांक ३३२/२१ कलम ३०७ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आला. पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा यांचे आदेशान्वये सदर गुन्हयात समांतर तपास करित असता जख्मी इसम चे कामाचे ठिकाणाचे साथीदार व त्याचे मोबाईल सीडीआर वरुन संशयीत ईसम गोविंद हरीकिशन दास वय २९ वर्ष रा. गोविंदपूर ता. मुलचेरा जि. गडचिरोली यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता. दि. ७/९/२१ रोजी मनिषनगर नागपूर येथे रोडचे बाजुचे ड्रेनेजचे काम सुरू असलेल्या साईड वरील मित्र देवेन राय (ह.मु. न्यु मनिषनगर नागपूर)रा. गोविंदपूर ता. मुलचेरा जि. गडचिरोली याचे कडे दिपांकर मंडल आला व तेथे दोन दिवस राहीला. त्यांनी दि. ९/९/२१ रोजी दिपांकर मंडल याने त्याला भिवापूर येथे जायचे आहे असे त्यांनी सोबतचे सहकारी देवेन ला म्हटले असता देवेन ने मला काम आहे मी गोविंदला तुला बसस्टापवर सोडण्यास सांगीतले, गोविंद यांनी दिपांकर यास आपले मो.सा.वर बसवुन सोडण्यास जात असता दिपांकर याने उदयनगर येथील देशी दारूचे दुकानात जावुन तेथुन चार देशी दारूच्या निपा घेतल्या व त्यापैकी एक निप तेथेच दोघांनी पिली व समोर दिघोरी पूला खाली येवुन तेथे गाडीत १००/—रू चे पेट्रोल टाकून निघाले असता विहीरगाव येथे थांबुन पुन्हा सोबत असलेल्या दोन देशी दारूच्या निपा दोघांनी पिल्यावर दिपांकर याने गोविंदला पुन्हा काही दुर सोडून दे म्हटले असता गोविंद त्यास घेवुन जात असता उटी शिवारात मानस (पुर्ती) गॅस कंपनी समोर गाडी थांबवून दोघेही शेता असलेल्या झाडाखाली जावुन बसले व तेथे उरलेली एक देशीदारूची निप पिले तेव्हा गोविंद याने दिपांकर यास म्हटले की, मी तुला आता समोर घेवुन जावु शकत नाही माझे गाडीत पेट्रोल नाही तेंव्हा दारूचे नशेत असलेल्या दिपांकरने गोविंद याचे गाडीची चाबी हिसकावुन घेतली व त्यास शिवीगाळ केली असता त्यांच्यात वादविवाद झाला त्यात गोविंदने तेथे असलेला दगड दिपांकर याचे तोंडावर, डोक्यावर मारून त्यास जख्मी करून त्यास तेथेच सोडून पळून गेला. आरोपीस पुढील तपास कामी पो.स्टे. कुही यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, पोना शैलेष यादव, सत्यशिल कोठारे, पोनि विरेन्द्र नरड, प्रणय बनाफर चालक चापोहवा भाऊराव खंडंतो, चापोना अमोल कुथे यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)




—: चोरी (चारचाकी वाहन) :—

पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०७ किमी अंतरावरील मौजा वाकोडी शिवार देविदासजी मदनकर यांचे शेताजवळ लक्ष्मण गुलाबरावजी पावडे रा. भानेगाव (खापरखेडा) यांनी दिनांक ०८/०९/२०२१ रोजी आपला नादुस्त रोड रोलर नं L&t w752 random vibratory compactor m/c Sr No J–236 उभे करुन ठवेले होते सदर रोड रोलर पंकज अशोक तांदुळकर वय ३२ रा वलणी यांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी लक्ष्मण गुलाबरावजी पावडे वय ३९ वर्ष रा. भानेगाव (खापरखेडा) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी पंकज अशोक तांदुळकर वय ३२ रा वलणी विरुध्द पो.स्टे. खापा येथे अप क्रमांक २५१/२०२१ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन ताब्यात घेण्यांत आहे असून पुढील तपाससफौ लोंदे मो नं.९८५०९ ००७६८ हे करित असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

**—: पळवुन नेणे :—**

पो.स्टे.केळवद :— दिनांक ११/०९/२०२१ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथे हजर येवून फिर्यादी यांनी आपली तोंडी रिपोर्ट नोंदवीली की तिची अल्पवयीन १५ वर्षाची मूली ला तीचा अज्ञानतेचा व अल्पवयाचा फायदा घेवून तिच्या कायदेशीर रखवालीतून शूभम बागडे वय २२ वर्ष रा रेल्वे स्टेशन झोपटपटटी केळवद यांनी पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी शूभम बागडे वय २२ वर्ष रा रेल्वे स्टेशन झोपटपटटी केळवद विरुघ्द पो.स्टे. केळवद येथे अप क्रमांक १८४/२०२१ कलम ३६३ भा.द.वी दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पळुवन गेलेली मुलीस त्यांचे नातेवाईकांकडे सुखरुप सुपुर्द करण्यात आले असून पुढील तपास पोउपनि उमेश नासरे मो. नं. ९९२३१३१५०७ हे करित आहे.

## —: प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु विक्री करणे :—

पो.स्टे.रामटेक :— दिनांक ११/०९/२०२१ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस पथकास गुप्त बातमीदारांकडून माहिती प्राप्त झाली ही ७ कि.मी. अंतरावरीत नगरधन येथील अक्षय शंकर नासरे रा नगरधन ता.रामटेक यांचेकडे राज्यत प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुचा साठा आहे मिळालेल्या माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाची नमुद ईसमास ताब्यात घेवून त्याची पडताळणी केली असता १) गोल्डन युग सुगंधीत तंबाखु ११९ प्रत्येकी २५० ग्रॅम एकुन ४२ नगप्रत्येकी किंमत १९५रू एकुण कि. ८१९०/—, २)बाबुली आर ३५ सुगंधीत तंबाखु प्रत्येकी ५०० ग्रॅम एकुण १२ नग प्रत्येकी किंमत ३५०/— एकुण कि. ४२००—,३) स्टार चिन्ह असलेला लाल रंगाचा सुगंधीत तंबाखु पॅकेट प्रत्येकी २५० ग्रॅम प्रत्येकी किंमत ३५० रू एकुण कि.४०००/— एकुण मुददेमाल १६,३९० रू चा महाराष्ट्र राज्यात सुगंधीत तंबाखुचे उत्पादन साठा, वितरण, विक्रीस निर्बंध घातलेले आहे हे माहीत असतांना सुध्दा जाणीव पुर्वक विना परवाना सुगंधीत तंबाखु अव्यध्यरीत्या बाळगतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोशी/२२२७ अतुल बांन्ते पो.स्टे. रामटेक चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी अक्षय शंकर नासरे वय २७ वर्ष रा नगरधन ता.रामटेक विरुघ्द पो.स्टे. रामटेक येथे अप क्रमांक ४०५/२०२१ कलम ३२८,२७२,२७३, भादवी सहकलम ५९ अन्न सुरक्षा आणि मनके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोउपनि पोउपनी प्रमोद राउत मो क्र. ९८८१६८३१८४ हे करित आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**